# पाहिजेत

सोलापूर येथील जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवर सफाईगार (स्विपर) या पदासाठी एकुण १२ जागांची प्रतिक्षा यादी तयार करावयाची आहे. त्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरहू पदासाठी इच्छुक उमेदवारांनी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.

वेतनश्रेणी ४४४०-७४४० अधिक ग्रेड वेतन १३००/-

| | | | |
|---|---|---|---|
| १ ) | पात्रता | :- | उमेदवार हा सुदृढ व संबंधित कामाची जबाबदारी पेलण्यास सक्षम व लायक असावा. |
| २ ) | वयोमर्यादा | :- | उमेदवार हा दिनांक ०१/०६/२०१५ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेला व कमाल वय ३३ वर्षापेक्षा जास्त असू नये. मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांने शिथील राहील. |

वरील पात्रता असणा-या उमेदवारांनी आपले अर्ज खाली दिलेल्या विहीत नमुन्यातच ''प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर'' यांच्या नावे लिहून आर.पी.ए.डी.ने दि.३०/०६/२०१५ अखेर कार्यालयीन वेळेत म्हणजेच सायंकाळी ६.०० पूर्वी या कार्यालयात प्राप्त होतील अशा बेताने पाठवावेत. सदर मुदतीनंतर व वेळेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. मुदतीत न आलेले अर्ज व जाहिरातीतील सर्व अटींची पूर्तता न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अगर त्याबद्दल कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही. अर्जदाराने स्वत: आणून दिलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच कुरीअर/स्पीड पोष्ट किंवा साध्या डाकेने पाठविलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

अर्जावर उजव्या बाजूस अर्जदार याने स्वाक्षरी केलेला ओळखपत्र आकाराचा एक अद्ययावत फोटो लावणे आवश्यक आहे. तसेच, अर्जासोबत जन्मतारखे बाबत व जातीबाबत तसेच जरुर त्या प्रमाणपत्राच्या ख-या नकला राजपत्रित अधिकारी (गॅझेटेड ऑफिसर) अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी अथवा नोटरी यांनी त्यांच्या सही

शिक्याने सांक्षांकित केलेल्या जोडाव्यात तसेच अर्जदार ज्या परिसरात राहात असेल, तेथील २ प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेले अर्जदाराच्या चारित्र व वर्तणुकीबाबतचे अद्ययावत दाखले अर्जास जोडणे आवश्यक आहे. अर्जदार हा निर्व्यसनी असावा तसेच त्याच्यावर कोणत्याही प्रकारची फौजदारी कारवाई झालेली नसावी, अगर तो कोणत्याही फौजदारी गुन्हयात गुंतलेला नसावा.

अर्जदाराने अर्ज पाठविते वेळी पाकिटावर ''सफाईगार पदासाठी अर्ज'' असा स्पष्ट उल्लेख करावा. तसेच सोबत स्वत: चे नांव व संपूर्ण पत्ता लिहीलेला रु. ५/- चे पोस्टाचे तिकीट चिटकवलेला एक लिफाफा पाठविणे आवश्यक आहे.

निवड प्रक्रियेसंदर्भात उमेदवारांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या वशिला आणल्यास अथवा तशा प्रकारचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास त्यास विनाविलंब अपात्र ठरिवले जाईल. अर्जदाराची सफाई करणेची परिक्षा व नंतर मौखिक चाचणी घेतली जाईल.

वरील पदे भरती करताना शासन निर्णयानुसार राखीव जागा आणि त्याबाबतचा अनुशेष यांचा विचार करण्यात येईल.

मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड केली जाईल. मुलाखतीस बोलाविल्यास अर्जदारास स्वखर्चाने यावे लागेल त्याला कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अथवा इतर भत्ता देण्यात येणार नाही.

शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एस.आरव्ही-२००० / प्र.क्र. (१७/२०००) / बारा, दिनांक २८ मार्च २००५ च्या अन्वये अर्जाच्या नमुन्याखाली देण्यात आलेले प्रतिज्ञापत्र भरुन देणे आवश्यक आहे.

**टीप :-**

१) प्रतीक्षा यादी प्रसिध्द झाल्यापासून ती फक्त २ वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध राहील.

२) एका पाकिटात फक्त एकाच उमेदवाराचा अर्ज असावा. एकाहून जास्त अर्ज एका पाकिटात असल्यास सर्व अर्ज अग्राहय ठरतील.

३) वरील सर्व अटींची पुर्तता होत नसेल तर अर्ज दप्तरी दाखल करण्यात येईल.

जिल्हा न्यायालय, सोलापूर.
दिनांक :- **१०**/०६/२०१५

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, सोलापूर.

D:\Estt establishment\Promotion\Promotion 2015\promotion 2015.sxw

# अर्जाचा नमुना

अर्जदाराचा फोटो

| | | |
|---|---|---|
| १ ) | अर्जदार ज्या पदासाठी अर्ज करित आहे : त्या पदाचे नाव | |
| २ ) | अर्जदाराचे संपूर्ण नाव ( आडनाव प्रथम ) : | |
| ३ ) | अर्जदार याचा राहण्याचा आणि पत्रव्यवहाराचा पत्ता ( कायमचा / तात्पुरत्या पत्यासह ) | : |
| ४ ) | अर्जदाराची जन्मतारीख ( अक्षरी व अंकी ) : | |
| ५ ) | अर्जदाराचे वर नमुद तारखेस पूर्ण वय ( दिनांक ०१ जुन २०१५ रोजी ) | : |
| ६ ) | शिक्षण ( असल्यास ) | : |
| ७ ) | अन्य काही विशेष अर्हता | : |
| ८ ) | धर्म जात व प्रवर्ग | : |
| ९ ) | मागासवर्गीय किंवा कसे | : |
| १० ) | नोकरीचा पुर्वानुभव | : |
| ११ ) | स्वातंत्र सैनिकांचा पाल्य, नात, नातू आहे काय ? व त्याबाबत नामनिर्देशन आहे काय ? | : |
| १२ ) | माजी सैनिक आहे काय ? | : |
| १३ ) | प्रकल्पग्रस्त आहे काय ? | : |
| १४ ) | अर्जदाराचे महाराष्ट्रातील न्यायिक विभागात जवळचे नोवाईक कामास आहेत काय ? ( उच्च न्यायालय व खंड पीठासह ) असल्यास नातलगाचे संपूर्ण नाव, हुद्दा, कामाचे ठिकाण. | : |

मी, सत्य प्रतिज्ञेवर असे लिहून देतो / देते की, वर नमुद केलेली संपूर्ण माहिती माझे माहितीप्रमाणे आणि समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे, यात कोणत्याही प्रकारची असत्यता आढळल्यास मी याबाबतच्या कारवाईस पात्र ठरेन.

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो / करते की, मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषीत केलेले नाही. मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझेविरुध्द कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

( अर्जदाराची सही व तारीख )

अर्जासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे :-

.......................................................................................................................

**प्र ति ज्ञा प त्र**

नमुना - अ

( नियम ४ पहा )

मी, श्री./श्रीमती/कुमारी ...........................................................

श्री. ................................................................... यांचा / यांची / मुलगा / मुलगी / पत्नी, वय ............. वर्षे, राहणार ..................................................... याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ............................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ................. (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ......... आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराची सही /-